# प्रेस नोट

## आरोग्य तपासणी शिबीर

जा.क्र. ४५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२९/०७/२०१६.

आज दिनांक २९ जुलै २०१६ रोजी पोलीस मुख्यालय भंडारा येथील पोलीस बहुद्देशिय हॉल येथे श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर व भंडारा जिल्हा पोलीस दल यांच्या संयुक्त विद्यमाने भंडारा जिल्हा पोलीसा करीता आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत करण्यात आले.

यावेळी मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहु यांनी पोलीस अधिकारी यांच्या मार्गदशनाखाली मा. उपविभागिय पोलीस अधिकारी, भंडारा जोगदंड सा. यांनी कर्मचा—यांना दैनंदिन कर्तव्या बजावतांना त्यांचे शारीरीक आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी शारीरीक तपासणी करुन आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहीजे असे मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनाकरीता मा. प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह) श्री. बी.आर. गाडे सा. व मा. उपविभागिय पोलीस अधिकारी, भंडारा श्री. जोगदंड सा. यांनी घेतलेल्या अथक परीश्रमाबद्दल मा. पोलीस अधिक्षक भंडारा यांनी त्याचे कौतुक केले.

यावेळी आरोग्य तपासणी करण्याकरीता शिबीरात श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर येथील डॉ. स्वप्नील वरुडकर, डॉ.पुनम सारडा, श्री. सागर, डॉ. संजय लहाने, डॉ. कोचे व त्यांची चमु तसेच सामान्य रुग्णालय भंडारा येथील डॉ. सागर सर उपस्थीत होते.

यावेळी आरोग्य शिबीरामध्ये मधुमेह, ब्लडप्रेशर, नेत्र तपासणी, दंत तपासणी, हृदयरोग व ई. सी. जी इत्यादीच्या तपासण्या करण्यात आल्या. तसेच महीलासाठी स्तन कर्करोग व गर्भाशयाचा कर्करोगाची तपासणी करण्यात आले.

यावेळी शिबिरामध्ये मा. उपविभागिय पोलीस अधिकारी, भंडारा जोगदंड सा. मा. प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री.गाडे सा. रापोनि. श्री. लोळे(पो.मु), पो. नी. राऊत वानीशा, एपीआय मानकर सुरक्षा विभाग, एपीआय इंगोले पो. स्टे कारधा डॉ .श्री. कोचे (पोलीस रुग्णालय भंडारा ) हे उपस्थित होते. तसेच भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन व शाखेचे पोलीस अधिकारी /कर्मचारी व त्यांचे कुटंबिय असे एकुण २७० लोकांनी या आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन व आभर प्रदर्शन म. पो. शि. शिल्पा जांगडे यांनी केले

पोलीस अधिक्षक
भंडारा करीता

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.